आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २८७ वा ● गुरुवार दि. ०४ एप्रिल २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### मतदानासाठी मिळणार भरपगारी सुटी, सवलत

नाशिक, (जिमाका) : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी राज्यात पाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. यात नाशिक जिल्ह्यात २० दिंडोरी आणि २१ नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी शेवटच्या पाचव्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भरपगारी सुट्टी किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य सवलत देण्यात येणार आहे. मतदारांनी मतदानासाठी मिळालेल्या सुटीचा व सवलतीचा फायदा घेऊन अवश्य मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी शर्मा यांनी केले आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १३५ (ब) नुसार मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाकडील २२ मार्च २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

### शहरातल्या ताई,पाणी जपून वापरा बाई!

शहरातल्या ताई,
पाणी जपून वापरा बाई!
तुमच्या बंगल्यात आहेत जागोजागी नळ
पिण्यासाठी,धुण्यासाठी
अंगणात सडा टाकण्यासाठीही
न्हाणी घरातल्या नळांचीही काय सांगावी हौस
कधी गरम कधी गार
कधी चक्क पाऊस!
एकेका नळाची एक एक नवलाई...
पण ताई,
पाणी जपून वापरा बाई
शहरात तुमचं बरं आहे
बटन दाबलं की पाणी आहे
कधी बोरचं,
कधी मुन्शीपाल्टीचं
सगळं आबादानी आहे
कालचं भरलेलं सरत नाही
म्हणून आजचं भांडं भरत नाही
कधी कधी म्हणे पाणी ठेवायला
भांडसुद्धा उरत नाही
फुलझाडांच्या अंगाखांद्यावर
पाणी खेळत राहतं
फरशी धुवा, गाड्या धुवा
घर भिजून जातं!
मोटर बंद करायचीही कुणास नसते घाई...
पण तरीही,
ताई,
पाणी जपून वापरा बाई
हंडाभर पाण्यासाठी
गाव तिकडं जागतंय
तासभर झिरा उपसल्यावर
पिण्यापुरतं भागतंय
उन्हातान्हात अनवाणीच
पाणी हुडकतात पाय
कडेवरती तान्हं घेऊन
धावते कुणाची माय...
वाटी वाटी पाणी उपसून
हंडा भरत नाही,
शहरातल्या ताई,
पाणी जपून वापरा बाई!
पाणी जपून वापरा बाई!

**संकलन -: सागर रामभाऊ तायडे भांडुप मुंबई.**

### विद्यार्थ्यांनी स्व-कर्तुत्वाने आई-वडिलांचा नाव लौकिक करावा सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने

लातूर : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक कालखंडामध्ये कष्ट, सातत्य आणि गरीबीवर मात करून स्व-कर्तुत्वाने आपल्या जन्मदात्या आई-वडिलांचा समाजामध्ये नाव लौकिक करावा असे भावनिक उद्गार सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहामध्ये शिव-बसव वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ निरोप आणि प्रमाणपत्र वितरण समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विद्यार्थी परिषदेचे प्रभारी डॉ. कॅप्टन बाळासाहेब गोडबोले, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आणि कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. विठ्ठल लहाने म्हणाले की, तरुणाईने दारिद्र्याची लाज न बाळगता आपल्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेसाठी पेटून उठले पाहिजे आणि एका नव्या विश्र्वाची निर्मिती केले पाहिजे. विद्यार्थी आणि शिक्षक देशाचे भविष्य आहे. उत्तम शिक्षण आणि शिक्षकांमुळे सुजाण नागरिक तयार होतात असेही ते म्हनाले. यावेळी महाविद्यालयातील गुणवंत प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभागातील गुणवंत विद्यार्थी आणि वार्षिक स्नेहसंमेलनातील विजेते स्पर्धक यांना स्मृतीचिन्हे, प्रमाणपत्र आणि पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी पाहुण्यांचा परिचय आणि मनोगत उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी व्यक्त केले आणि अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला.




# समरसता मंच व विहिंपच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आनंद कोटंबेंची रुग्णालयात भेट

**लातूर : येथील डॉ. प्रमोद घुगे यांच्याकडून अमानवीय अत्याचार झालेल्या आनंद कोटंबे या पिडीत व्यक्तीची तो शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना सामाजिक समरसता मंच आणि विश्र्व हिंदू परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन त्याला मानसिक आधार देण्याचे काम केले.**

डॉ. प्रमोद घुगे यांच्या लातूरस्थित आयकॉन हॉस्पिटलच्या लिफ्टचे काम करणाऱ्या आनंद कोटंबे यांना त्यांच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त करत डॉ. प्रमोद घुगे यांनी आनंद कोटंबे यांचे अपहरण करून त्यांना आपल्या फार्महाऊसवर डांबून ठेवले होते. त्याच्यावर करण्यात आलेले अत्याचार अक्षरशः अमानुष प्रकारचे होते. त्यांना झालेल्या यातना, करण्यात आलेल्या अत्याचाराचा पाढाच आनंद कोटंबे यांनी या पदाधिकाऱ्यांपुढे वाचून दाखवला. डॉ. प्रमोद घुगे हा केवळ नावालाच माणूस आहे, बाकी त्याची कृती एखाद्या हिंस्र पशूसारखी असल्याची भावना यावेळी सामाजिक समरसता मंचचे निलेश गदरे यांनी बोलून दाखवली. आनंद कोटंबे यांना डॉ.घुगे यांच्या गुंडागर्दीला न घाबरता वास्तव जे काही घडले आहे ते समाजासमोर आले पाहिजे यासाठी हिमतीने



पुढे या, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू,असा विश्र्वासही निलेश गदरे यांनी व्यक्त केला. विश्र्व हिंदू परिषदेचे एड. गौरीशंकर कौळखेरे यांनीही यावेळी आपण सगळे मिळून या प्रकरणाला वाचा फोडून पिडीत आनंद कोटंबे यांना न्याय मिळवून देऊ असे सांगितले. या पदाधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाचा तपास करणारे लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांचीही भेट घेऊन त्यांच्याकडे डॉ. प्रमोद घुगे यांच्यावर आजपर्यंत झालेल्या तक्रारींचीही सखल चौकशी करावी, पिडीत व्यक्तीला जीवे मारण्याचा प्रयत्न झाला आहे काय याचा फॉरेन्सिक रिपोर्ट लवकरात लवकर मागवून घेऊन गुन्ह्यात भादंवि. कलम ३०७ ची वाढ करण्याची मागणीही केली.

यावेळी समरसता मंचचे संयोजक शाम बलुतकर, बजरंग दल महानगराचे संयोजक सूर्यासिंग राजपूत यांचीही उपस्थिती होती.

### श्री. सुधाकर शृंगारे यांचा लातूर लोकसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टी व महायुतीचे महाविजय २०२४ अभियान मधून सक्रीय सहभाग

लातूर- भारतीय जनता पार्टी व महायुतीचे महाविजय २०२४ अभियान



मधून उदगीर विधानसभा मतदारसंघात श्री सद्गुरू उदगीर बाबा महाराज यांच्या समाधीचे दर्शन, हजरत खाजा बाशा दर्गाह येथे चादर अर्पण, श्री उद्धव महाराज हैबतपूरकर चौबारा, सद्गुरु हावगी स्वामी महाराज मठ, माजी आमदार श्री. सुधाकरजी भालेराव, भाजप युवा मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री अमोलजी निडवदे, माजी नगरसेवक (राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट) गोरक्षण संस्था आणि भावसार समाजाचे पदाधिकारी व प्रतिनिधी यांचेशी राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे मंत्री श्री. संजयजी बनसोडे यांच्यासह विविध कार्यक्रमातून लोकसंवाद केला.

या वेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री. बसवराजजी कौळखेडकर, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष श्री. पंडित सूर्यवंशी, माजी आमदार श्री. गोविंदअण्णा केंद्रे, माजी आमदार श्री. सुधाकर भालेराव, लोकसभा निवडणूक प्रमुख श्री. राहुल केंद्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस श्री. भारत चामे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. रामभाऊ तिरुके, भाजप उदगीर शहराध्यक्ष श्री. मनोज पुदाले, माजी जि. प. सभापती श्री. बापूराव राठोड, श्री. सिद्धेश्र्वर पवार, आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

### महाराष्ट्र शासनाचे १८ वर्षे मुदतीचे २ हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई, : महाराष्ट्र शासनाच्या १८ वर्षे मुदतीच्या २ हजार कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. ८ एप्रिल २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् ८ एप्रिल २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १० एप्रिल २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी १८ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी १० एप्रिल २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक १० एप्रिल २०४२ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी ऑक्टोबर १० आणि एप्रिल १० रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

### आचारसंहिता काळामध्ये बांधकाम कामगारांची सर्व कामाचे ऑनलाईन पोर्टल चालू ठेवावे यासाठीचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणुक अधिकारी श्री एस चोकोलिंगम यांना मुंबईत तारीख ३ एप्रिल रोजी सादर.

मुंबई प्रतिनिधी - संपूर्ण राज्यांमध्ये आचारसंहिता



लागू झाल्यानंतर एकतर्फी महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव श्री विवेक कुंभार यांनी बांधकाम कामगारांची सर्व कामे करणे बंद केलेली आहेत. यासाठी त्यांनी कसलीही परवानगी निवडणूक निर्णय अधिकारी यांची घेतलेली नाही. असे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून समजले.

याबाबत कामगार विभागाचे उपसचिव श्री दादासाहेब खताळ यांची शिष्टमंडळाने मंत्रालयामध्ये भेट घेतली असता त्यांनी असे सांगितले की जी सर्व ऑनलाईन कामे आहेत ती बंद करण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी दोनच दिवसांमध्ये आम्ही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करीत आहोत.शिष्टमंडळाच्या वतीने बोलताना याबाबत कॉ शंकर पुजारी यांनी सांगितले की राज्यातील २०२२ मधील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या वेळेस मुख्य निवडणूक उप आयुक्त यांनी बांधकाम कामगारांचे ऑनलाइन पोर्टलचे काम बंद ठेवण्याची आचारसंहितेमध्ये आवश्यकता नसते असा निर्णय देऊन सुद्धा स्वतःच्या लहरीप्रमाणे श्री विवेक कुंभार यांनी सर्व कामे बंद करून राज्यातील ३० लाख बांधकाम कामगारांचे नुकसान करणे चालू ठेवलेले आहे.

दरम्यान महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव श्री कुंभार यांनी बांधकाम कामगारांचे महत्त्वाची कामे बंद ठेवून कंत्राटदारांचे भरे करणारे कामे मात्र सुरू ठेवलेली आहेत. या प्रकारे श्री विवेक कुंभार यांनी आचारसंहितेचे भंग केलेला आहे म्हणून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशी ही मागणी करण्यात आलेली आहे. दरम्यान श्री विवेक कुंभार यांनी महाराष्ट्रातील पंधरा लाख बांधकाम कामगारांचे अर्ज जाणीवपूर्व प्रलंबित ठेवलेले आहेत याबद्दलही त्यांच्यावर कारवाई करावी.बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मध्यान भोजन योजनेतील अडीच हजार कोटीं भ्रष्टाचाराची त्वरित चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.

तसेच अशीही मागणी करण्यात आली की बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर आयएएस अधिकाऱ्यांची सचिव म्हणून नेमणूक करावी.वरील सर्व अन्यायाविरुद्ध आणि बांधकाम कामगारांना न्याय मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयामध्ये सर्व संघटनांच्या वतीने रीट पिटीशन दाखल करण्याचाही कृती समितीच्या उपस्थित सदस्यानी निर्णय घेतलेला आहे. महाराष्ट्रातील विविध बांधकाम कामगार संघटनांचे नेते कॉ शंकर पुजारी,साथी सागर तायडे,साथी विनिता बळीकुंद्रे, कॉ.रमेश जाधव, साथी काशिनाथ नकाते,श्री आनंद भालेराव, श्री मनीष गौरखेडे, श्री रवी पवार श्री तानाजी गायकवाड,श्री सुरज भालेराव इत्यादींचा शिष्टमंडळामध्ये समावेश होता.

# मोदी सरकारमुळे गोरगरीबांच्या सहभागातून विकसित भारताकडे वाटचाल भाजपा विधान परिषद गटनेते आ.प्रवीण दरेकर यांचे प्रतिपादन

मुंबई : मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी गोरगरिब, वंचितांचा विकास करून विकसित भारत संकल्प प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. सरकारी योजनांच्या निधी वाटपातील भ्रष्टाचार थांबवून गोरगरिब, गरजू वर्गांपर्यंत योजनांचे लाभ १०० टक्के पोहचविल्याने सुमारे २५ कोटी भारतीय दारिद्र्यरेषेच्या वर आले आहेत, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी बुधवारी केले. मुंबई भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.दरेकर बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. गरजेनुसार आर्थिक धोरणात केलेले बदल आणि राबवलेल्या आर्थिक सुधारणांमुळे आज देशाची अर्थव्यवस्था ही जगात पाचव्या क्रमांकाची बनली आहे असेही त्यांनी सांगितले.

श्री.दरेकर यांनी मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी, देशाच्या अर्थव्यवस्थेचे २०१४ पर्यंतचे चित्र आणि गेल्या १० वर्षांत अर्थव्यवस्थेची झालेली घोडदौड, पायाभूत सुविधांचा २०१४ पासून झालेला विकास याचा लेखाजोखा आकडेवारीसह सादर केला. ते म्हणाले की, ४ कोटी गरजूंना पक्की घरे, ८० कोटी जनतेला मोफत अन्न धान्य, १४ कोटी कुटुंबांच्या घरात नळाद्वारे पिण्याचे पाणी, १०




कोटी गॅस कनेक्शन, १२ कोटी स्वच्छतागृहांची बांधणी, सौभाग्य योजनेमुळे ग्रामीण भागात १०० टक्के विद्युतीकरण, कोरोना संकटातून बाहेर पडण्यासाठी ७८ लाख फेरीवाल्यांना १० हजार कोटींचे कर्ज, सरकारी निधीच्या वाटपात होणारी गळती थांबवून लाभार्थ्यांपर्यंत १०० टक्के पोचवणे ही मोदी सरकारच्या १० वर्षांतील कामगिरीची ठळक वैशिष्ट्ये आहेत. ५१ कोटी पेक्षा अधिक नागरिकांची जनधन बँक खाती सुरु केल्याने एका पैशाचीही गळती न होता सरकारी योजनांचे अनुदान, अर्थसाह्य थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. गेल्या १० वर्षांत ३४ लाख कोटी रु. लाभार्थ्यांच्या बँक खात्यांत जमा झाले आहेत. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन दिल्यामुळे २०१६ पासून गेल्या ८ वर्षांत २६ हजार ५०० कोटी एवढ्या रकमेचे व्यवहार युपीआय द्वारे झाले आहेत.

यूपीए सरकारच्या कारभाराची तुलना भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारशी करत आज देशात घडलेले परिवर्तन दर्शवणारी आकडेवारीही आ.दरेकर यांनी यावेळी सादर केली. आ. दरेकर यांनी सांगितले की, २०१४ साली एलपीजी गॅस सिलेंडर्स वर सरकारकडून मिळणारी सबसिडी डीबीटी म्हणजे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजने अंतर्गत थेट बँक खात्यात जमा करणे बंद केले होते. मोदी सरकारच्या काळात २०२२ पर्यंत गरीब कुटुंबांची ७३,००० कोटींची बचत डीबीटी मुळे झाली. २०१४ साली प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत केवळ ५५ टक्के गावे रस्त्यांनी जोडली गेली होती. २०२३ पर्यंत ९९ टक्के गावे ही रस्त्यांनी जोडली गेली. २०१४ साली माफक दरात औषधे पुरवणारी केवळ ८० जन औषधी केंद्रे देशात होती. तीच आजमितीला १० हजार केंद्रे आहेत. २०१४ साली ग्रामीण भागात सरासरी १२.३० तास वीज पुरवठा होत असे, आज तोच साडे बावीस तास होत आहे.

प्रत्येक घटकापर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहोचावेत याला प्राधान्य देत त्या दिशेने प्रयत्न करण्यात आल्याचे आ.दरेकर म्हणाले. देश विकास हेच मोदी सरकारच्या सत्तेचे ध्येय असल्याने त्याच दिशेने विकास कार्ये झाली. त्यामुळेच देशाचा विकसीत, आत्मनिर्भर भारताच्या दिशेने प्रवास गतीने सुरु आहे. आगामी पाच वर्षांमध्ये सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहीलेल्यांपर्यंत लाभ पोहोचवण्याचा संकल्प मोदी सरकारचा आहे, असेही ते म्हणाले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – भाजप नेते खा. अशोक चव्हाण हे अर्धापूर विधानसभा मतदारसंघात कोंढा या गावी जातात मराठा समाजाच्या आंदोलकांनी घोषणाबाजी करून त्याचा ताफा अडविला पण चव्हाण किंवा इतरांची तक्रार नसताना सरकारी कामात अडथळा म्हणून पोलिसांची कारवाई आणि घडलेल्या घटनेचा काँग्रेसतर्फे निषेध हे सारे काय चालले आहे. तेच कळत नाही डोकं बधीर झाले.

दुसरा – अरे, भाजपा काय आणि काँग्रेस काय हे एकाच माळेचे मणी आहेत तू कशाला अशा नौटंकी भानगडीत पडतोस. तुच आहे तूजपाशी म्हणून शांत बसणे हेच महत्त्वाचे आहे कळले.

एक – अहो, भाजपा– काँग्रेस बद्दल माझे काहीही म्हणणे नाही पण अशोक चव्हाण यांचा ताफा आडवीला–घोषणा दिल्या त्याचे कारण अशोक चव्हाण यांना त्या गावच्या मतदारांना काँग्रेसला धोका दिला हा राग होता त्यात अशोक चव्हाण हे खासदार असले तरी लोकसभा आचारसंहिता असल्याने सरकारी काम कोणते होते मग पोलिसांनी मराठा कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल का केली व काँग्रेसने निषेध का केला हेच कळत नाही म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, काँग्रेस कार्यकर्त्यांनी तेथील कार्यकर्त्यावर पोलिसांनी गुन्हा का दाखल याबद्दल पोलिसाचा निषेध केला आहे कारण महाराष्ट्रात भाजपा आघाडीचीच सत्ता आहे म्हणूनच पोलिसांनी चव्हाण यांची बाजू घेऊन कारवाई केली हे उघडच आहे.

एक – अहो, पण अशोक चव्हाण किंवा त्यांच्या पत्नीची, कार्यकर्त्याची पोलिसात तक्रार नसताना पोलिसांनी लागुंणचालन कशासाठी केले हेच कळत नाही.

दुसरा – अरे, राजकारण–सत्ताकारणात कोणी–कोणाचा वैरी किंवा मित्र नसतो ऐनवेळी मित्र आणि अचानक शत्रूही होत असतात त्यामुळे अशा विषयावर तू डोकं खाजगी जाऊ नकोस.

एक – अहो, काहीतरीच बोलता मी एक भारतीय नागरिक–मतदार आहे मला बोलायचं–विचारपूस करण्याचा अधिकार आहे. हे लक्षात ठेवून मग मला बोला.

दुसरा – अरे, अशोक चव्हाणाचा आदर्श तुला माहित नाही ती उडी मागे लागली म्हणून काँग्रेस सोडून ते भाजपात गेले मग ते पारदर्शक न्यायिक नेते बनले मग त्यांच्या प्रवासात अडथळा म्हणजे सरकारी कामात अडथळा म्हणून कारवाई केली तू काहीतरी बोल म्हणजे तुला ईडी आणि महाराष्ट्राचे अर्धापूरचे पोलीस कोण आहेत ते कळेल कशाला भानगडीत पडतोस अन्यथा खैर नाही.

## काय बोलता राव ?

महायुती असो की महाविकास आघाडी असो पण त्या –त्या आघाडीत–पक्षात अजित पवार यांचा सारखा खमक्या नेता–कार्यकर्ता असावा लागतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे विजय शिवतारे यांना पक्षातून हकालपट्टी करा त्यांना आवरा नाहीतर चक्क भाजपा महायुतीतुनच बाहेर पडू असा सज्जड दम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादी गटाचे पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील यांच्या मार्फत प्रसिद्धी माध्यमातून दिला आहे.

**काय बोलता राव,**

अरे, वंचित बहुजन आघाडीच्या अँड. प्रकाश आंबेडकर यांना इंडिया महाविकास आघाडीने डावले तर मग भाजपा महायुती रामदास आठवले यांना डावलू शकत नाही उलट महायुतीची सत्ता आल्यास केंद्रात कॅबिनेट मंत्रीपद, विधान परिषद सदस्य, महामंडळात वर्णी वगैरेची ग्वाही भाजपा श्रेष्ठींनी दिल्यानेच ही अशी तडजोड मान्य करून खुद रामदास आठवले यांनीच माघार घेतली आहे मग मुंबईतील कार्यकर्त्यांनी त्यांच्या सोयीसाठी तशी नौटंकी केली असेल त्याबद्दल काळजी कशाला मग बोला दाजीबा.

### सुपरहिट 'सिरी लंबोदर विवाह' कन्नड चित्रपटाचा मराठी वर्ल्ड डिजिटल प्रीमियर 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर!

लग्न करण्यापेक्षा लग्न जमवणं जास्त अवघड असतं, मात्र संजय आणि लीला यांनी 'सिरी लंबोदर विवाह' चित्रपटात लग्न जमवण्याचा विडा उचलला आहे. 'सिरी लंबोदर विवाह' चित्रपट मूळ कन्नड भाषेत असून 'संजय लीलाची प्रेम कहाणी' या नावाने मराठीत पहायला मिळणार आहे. 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर ५ एप्रिल २०२४ रोजी चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे.

एकाच शाळेत आणि ट्यूशनला जाण्यापासून संजय आणि लीला एकत्र मोठे झाले आहेत. शिक्षण पूर्ण केल्यानंतर विवाह संस्था उघडतात. तेव्हा त्यांना राजकारणाची पार्श्र्वभूमी असलेल्या एका लग्नाच्या नियोजनाची संधी मिळते. या लग्नादरम्यान १०० कोटींचा एक रहस्यमय गोंधळ उद्भवतो आणि गोष्टीला एक अनपेक्षित वळण मिळतं. हे वळण नेमकं कुठे जाऊन पोहचणार, हे चित्रपटात कळणार आहे. चित्रपटाचे विलक्षण दिग्दर्शन नवोदित दिग्दर्शक सौरभ कुलकर्णी यांनी केले असून अंजन भारद्वाज आणि दिशा रमेश या जोडीचे या चित्रपटातून सुपरहिट पदार्पण झाले आहे.

दाक्षिणात्य चित्रपटांतून दाक्षिणात्य संस्कृती आणि खास कला आपल्याला पहायला आणि अनुभवायला मिळते. चित्रपटांमधून विविध संस्कृतींची देवाण घेवाण व्हावी, आणि चांगली कलाकृती भाषेच्या बंधनात अडकून न राहता प्रेक्षकांपर्यंत पोहचावी म्हणून हा आमचा प्रयत्न आहे. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेंमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

नवनवीन चित्रपट पाहण्यासाठी:– https://www.ultrajhakaas.com/marathi-movies प्रसिद्धी जनसंपर्क प्रमुख : राम कोंडीलकर, राम पब्लिसिटी, मुंबई संपर्क : मो. / व्हॉट्सअँप – ९८२१४९८६५८

# उपायाला पर्यायच नसेल तर..?

## संपादकीय...

लोकशाहीत लोकराज्याला अधिक महत्त्व असते त्यासाठी अनेक सक्रिय कार्यकर्ते, अनुभवी, विद्वान कार्यकर्ते सर्वच पक्षात असतानाही त्यांना त्यांच्या कृतिशील–प्रामाणिकतेमुळे तेच लोकसभा निवडणुकीत यश प्राप्त करू शकत नाहीत असा भ्रम पक्षश्रेष्ठीना झाला असेल तर त्या रुपयाला पर्याय उरत नाही म्हणूनच नवख्यांना, बंडखोरांना किंवा बंडखोरी करून पक्षांतर करून आलेले नेते कार्यकर्त्यात पक्षीय राजकारणाला बळ देत असतील तर न्यायाला अन्याय करू शकतो अशीच परिस्थिती सर्वच राजकीय पक्षाची झाल्याने लोकसभा निवडणुकीतील उमेदवार निश्र्चित करण्यासाठी तमाम राजकीय पक्षात गोंधळ निर्माण झाल्याने महायुती–महाविकास आघाडीच्या रस्सीखेचीत लोकशाहीच घुटमळताना दिसते आहे ते लोकराज्य म्हणावे काय अशी विवेचनात्मक प्रसंग मतदारांना भेडसावताना दिसतो आहे.

लोकसभा निवडणुकीत लोकराज्य निर्माण करण्यासाठी त्यातून लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदाराच्या मतदानाची निकट अनिवार्य असतानाही मतदारांना हातचे बाहुले समजून त्यांच्या माती नको ते उमेदवार समोर आणून सत्ता हस्तगत करू पाहणाऱ्या राजकीय नेत्यांनी स्वतःच्या पक्षाची आणि स्वतःची लाज–लज्रा वेशीला सांगून चक्क निर्लज्रपणे मतदारांना हाच खरा लोकप्रतिनिधी आहे. त्यातच मतदान करावे अशी भीक मागण्यासाठी त्यांची जीभ आणि हात थरथरत नसतील तर अशा लाजिरवाण्या प्रयत्नाला काय म्हणावे हेच राजकारणाच्या चाणक्य आणि प्रचारासह प्रसार माध्यमांनाही कळेनासे झाल्यास उपायाला पर्यायच नसेल तर लोकराज्य कसे निर्माण होईल अशी संध्दिगता निर्माण झाल्याचे स्पष्ट होत असेल तर त्याचे मोजमाप कसे करावे अशी चिंता निर्माण झाल्याचे चित्र दिसते आहे.

मतदाराच्या मतदानातूनच लोकप्रतिनिधी ठरत असतात त्यातूनच शासक ठरविले जातात पण लोकशाही–लोकराज्य बाजूला ठेवून सर्वच राजकीय पक्ष सत्तेसाठी हापापले असतील तर उद्याचा लोकशाही भारत काळया लोकशाही भारत गुलामीच्या जोखंडात अडकल्याशिवाय राहणार नाही हा संभावे धोका समोर असतानाही धुरीण . राज्यकर्ते आणि राजकारणी नेते अशा अवास्तव प्रसंगाला गुंडाळून स्वतः चे सत्ताकांशी घोडे दामटत असतील तर त्याचे वर्णन कसे व कोणत्या शब्दात करावे हे एक कोडेच होऊन बसल्याचे दिसते आहे. कारण महायुती–महाविकास आघाडीतील लोकसभा निवडणुकीसाठी त्या–त्या मतदारसंघात विकासात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला डावलून विजयी होऊ शकणारा एकास–एक उमेदवार देण्याचीच कसरत सर्वपक्षीय नेते करीत असल्याने यातून केवळ सत्ता हस्तगत करणे हाच एकमेव धोरणात्मक ठोकताळा दिसतो आहे मग ही लोकसभा निवडणूक आहे की राज्यसत्ता निवडणूक आहे हा प्रतिशोध घेण्याची वेळ मतदारासह प्रसार माध्यमावर येऊन ठेपली आहे यातूनच पर्याप्त पर्याय शोधण्याची शक्यता नाकारता येत नाही याशिवाय दुसरा विकल्प असूच शकत नाही अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाप्रणित महायुती आवडीने किंवा काँग्रेसप्रणित महाविकास आघाडीने सक्रिय कार्यकर्त्यांना डावलून जो कोणी निवडुन येऊ शकतो हेच गणित समोर ठेवून उमेदवार निश्र्चित केले आहेत–करीत आहेत त्यामुळे निष्ठावंतांना अन्याय आणि गद्दारांना–बंडखोर–भ्रष्ट आणि पक्षांतर केलेल्यांना न्याय हेच लोकशाहीतले मापदंड स्वीकारल्याने उद्याची लोकशाही तली लोकसभा ही झुंडशाहीचेच प्रतीक ठरू शकेल यात संधीह नसावा असाच खल राजकीय वर्तुळासह प्रसार माध्यमातून होताना तो नाकारता येऊ शकत नाही असे वाटते.

आम्हीच लोकशाही राज्य टिकवुन भारत बळकट करू शकतो असे गवगवा करणारी महायुती आणि लोकशाही संविधान वाचवून–टिकवुन लोक न्यायीक सत्ता आम्हीच निर्माण करणारी महाविकास आघाडी अर्थात इंडिया म्हणते परंतु या दोन्ही आघाड्याचे एकमेव लक्ष हे लोकविकासाचे–लोक निर्माण राज्याचे नसून केवळ म्हणजे केवळ आपापली सत्ता यावी हेच एकमेव धोरण असल्याने मतदार आणि त्याचे मतदान हाच पर्याय आणि त्यावरचा उपाय असताना उपायालाच पर्याय नाही असे दाखवून लोकसभा निवडणुकात विजय प्राप्त करून अशा घातकी–मतलबी आघाडयानी काय साध्य करायचे आहे ते कालच ठरविल यात अन्य कोणता विकल्प असूच शकत नाही.

# संविधान धोक्यात नेते कोमात !

**नुकतेच नागपूर लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाले, संविधान वाचविण्यासाठी आंबेडकरी विचारांचे विचारवंत आंबेडकरी संविधानवादी मतदार या देशातील मोदी राजवटीच्या कार्याचं आकलन गेल्या दहा वर्षाचे केल्यास असे आढळून येते की, मोदी राजवटीत भारताचे संविधानाला न जुमानता हुकुमशाही पद्धतीने देश चालविला जात आहे. याचे अनेक उदाहरणे नजरेसमोर आहेत. जसे १५० खासदाराचं संसदेतून निलंबन, कायदा असतांनी मणिपुर मध्ये स्त्रियांची नग्नधिंड काढली पण मोदी सरकारने काहीही हस्तक्षेप केलेला नाही. कायदा असतांना संपुर्ण भारतात झुंडशाही निर्माण करुन अल्पसंख्याक व दलितांवर दहशत निर्माण केली. जातीय दंगली याच राजवटीत झाल्या, निवडणुकांमध्ये रोख्यांचा करोडो रुपयांचा घोटाळा ईडी आणि सीबीआयचा चुकीचा वापर करणे व निवडून आलेल्या मुख्यमंत्री केजरीवाल व सोरेन यांना विनाकारण केलेली अटक. दिल्लीचे जंतर मंतर मध्ये मोदी भक्तांनी भारतीय संविधानाची होळी केली, हे सगळं संविधान विरोधी घटना देशात मोदी सरकारच्या काळात होत आहे, ही देशाची फार मोठी शोकांतिका आहे. अनेक वेळा भाजपचे नेते अनंतकुमार हेगडे आम्हाला बाबासाहेबांच संविधान मान्य नाही ते आम्ही बदलविणारच, असे बोलले हे संपुर्ण देशातील लोकांनी ऐकले आहे.**

हा सर्व देशातील संविधान विरोधी घटनाक्रम असतांनी संविधान बदलविण्याचा निर्धार करणारा भाजप संविधानाला न जूमानता हुकुमशाही प्रवृत्तीने काम करीत आहे, हे जनतेला कळलेच. भाजप व संघ राष्ट्रद्रोही हुकुमशाहीच समर्थन करणारं संघटन आहे, हे खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच सांगितले होते, पण कोणत्याच आंबेडकरी नेत्यांना या विचारा संदर्भात काहीही देणे घेणे दिसत नाही. फक्त वैयक्तिक स्वार्थासाठी स्वःतला आंबेडकरी चळवळीचा नेता समजणाऱ्या नेत्यांनी बलशाली असलेल्या आंबेडकरी संघटनेचे असंख्य तुकड्यात विभाजन करून महामानवाच्या विचाराचा सत्यानाश केला आहे, हे अधोरेखित सत्य आहे.

आज संविधान खरोखर ४०० पार घोषणेने धोक्यात आहे, इतके ठामपणे कसे काय म्हणू शकतात ? आता ही लढाई आरपार झालीच पाहिजे. तेव्हाच संविधान जपवणूक करता येईल. ही लढाई संविधान विरुद्ध भाजप अशी आहे, म्हणून सध्या संविधान वाचविण्यासाठी लढणाऱ्या विरोधी पक्ष इंडिया आघाडी मध्ये आंबेडकरी नेते पाहिजे होते. परंतू ते मैदानात नाहीत. संविधान विरोधी पक्षाच्या उमेदवाराला आंबेडकरी नेते मतासाठी आव्हान करतांना दिसत आहेत, कशी ही पिलावळ ? आंबेडकरी विचारांचा स्वाभिमान तुडवल्या जात आहे ही लांछणास्पद बाब आहे. संपूर्ण जगात डॉ. बाबासाहेबांची उंची वाढत असतांना भारतात बाबासाहेबाचेच स्वार्थी नेते बाबासाहेबांच्या राजकीय विचारांची उंची कमी केल्याचे महापाप यावेळी होतांना दिसत आहे. येत्या काळात आंबेडकरी चळवळ संपणार हे सुर्यप्रकाशा इतकं सत्य आहे. म्हणून तमाम आंबेडकरी मतदार संविधानवादी मतदार नेत्या मागे न लागता सध्या संविधान विरोधी उमेदवाराचा पराभव करण्यासाठी तत्पर होणे देशाचे संविधान वाचविण्यासाठीच मतदान करणे गरजेचे झाले आहे. संविधान वाचले तर देश वाचेल आणि देश वाचला तर आपण सगळे वाचू. अन्यथा आपण सगळे येत्या काळात हुकुमशाहीच्या जाळयातच जीवन जगावे लागेल. संविधानातच मुलभूत अधिकार, आरक्षण सुरक्षित आहे. आजपर्यंत ७५ वर्ष जसे संविधान या देशात संविधानवादी व आंबेडकरवादी जनतेनी सुरक्षित ठेवले तसेच येणाऱ्या पिण्यासाठी सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. यासाठी मैदानात येऊन संविधान विरोधकांना जो उमेदवार रोखु शकते अशा उमेदवारांसाठी मोठ्या प्रमाणात संविधान वाचविण्यासाठी मतदान करणे गरजेचे झाले आहे. अन् हीच आज काळाची गरज आहे. तेव्हाच आपला निभाव लागेल, अन्यथा सर्व कुचकामी ठरेल. मतदारांनी विवेकवादी विचार करुनच मतदान करावे.

स्वातंत्र्य हे कर्तव्याच्या जबाबदारीच्या कोंदणात शोभणाऱ्या हिऱ्यासारखं आहे. कोंदणाशिवाय हिऱ्याला जसे खरे सौंदर्य प्राप्त होत नाही, तसे स्वातंत्र्याला जबाबदारीचे कोंदण असल्याशिवाय ते सुंदर होऊ शकत नाही. समान संधी, लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य समता न्याय, बंधुता ही मुल्ये बाबासाहेबांनी भारतीय राज्य घटनेत समाविष्ट करुन आपल्या राष्ट्राला मंगलमय भविष्य दिले. या करीता आम्ही सव भारतीय त्यांचे कृतज्ञ आहोत. ही जाणीव प्रत्येक भारतीयांच्या मनात असलीच पाहिजे.

मूल्ये सत्यान्वेषणाचं असतं, मानवतेचं असतं, समानतेचं असतं आणि बंधुत्वाचं असतं. समानतेत भेदाभेद मानणं, स्त्रीचा आदर राखणं, दुसऱ्यांना सन्मानाने वागवणं, त्याचे हक्क त्यांना देणे या बाबी येतात. ही मूल्य न मानणं आणि या मूल्यांची प्रतिकं मिरवणं हा प्रतिगामीपणा ठरतो. त्याचा विरोध सर्वांनी करण्याची गरज आहे आणि तो केलाच पाहिजे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील शेवटचे भाषण.

एखाद्या देशाचे सविधान कितीही चागंले असेल पण चालविणारे लोक जर योग्य नसेल तर ते कुचकामी ठरेल. पण एखाद्या देशाचे संविधान कितीही वाईट असेल आणि चालविणारे जर चांगले असेल तर ते संविधान देशाचा उध्दार करेल. आज हेच संविधान नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेत घेऊन जसेच्या तसे लागु केले. भारताच्या संविधानाधानावर जागतिक मानव अधिकार संघटन काम करते आणि भारतीय राज्यघटनेचा भाग हाच जगातील काम करणाऱ्या जागतिक मानव अधिकार आहे. हेच संविधान बदलण्याची भाषा होत असेल तर हा डाव हाणून पाडणे हे या देशातील संविधान प्रेमीची ही लढाई आहे आणि ते लढण्यास सज्ञ झाले आहे.

१४ एप्रिल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती. बाबासाहेबांचा संघर्ष स्मरुन गावात, देशात संविधान सुरक्षित राहील या दृष्टीने प्रयत्न करावे या महापुरुषांच्या शांतता, शैक्षणिक, सामाजिक विचारांचा प्रचार प्रसार करावा.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**
**ई-मेल :** pravinbagdegmail.com

### काही विशिष्ट लोक जर न्याय व्यवस्थेवर दबाव टाकत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब

देशात अनेक कायदे–कानून आहेत व देश संविधानाच्या चाकोरीतून चालतो त्यामुळेच भारतात लोकशाही टिकून आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत जे काही राजकीय वर्तुळात सुरू आहे त्यावरून असे वाटते की न्याय व्यवस्थेवर दबाव आणुन ढवळाढवळ करण्याचे काम काही लोक करीत आहे असे वकिलांच्या लक्षात आले.त्यामुळे जेष्ठ विधिज्ञ हरिश साळवे,बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मननकुमार मिश्रा यांच्यासह ६०० वकिलांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना पाठविलेल्या एका पत्रात मागणी केली आहे की अशा कारवायांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी या पत्राव्दारे करण्यात आली आहे.

भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या नेत्यांविरोधातील खटल्यांमध्ये काही मंडळींकडून न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचे प्रयत्न होतात.या खेळीमुळे न्यायव्यवस्थेचे मोठे नुकसान होत असुन लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला आहे असेही पत्रात म्हटले आहे.यावरून स्पष्ट होते की दबाव तंत्राचा वापर करून ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होते किंवा आहे अशा काही राजकीय पुढाऱ्यांना अचानक क्लीन चिट दिली जाते.त्यामुळे यावरून स्पष्ट होते की ज्या ६०० वकिलांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहून न्याय व्यवस्थेमध्ये सुरू असलेल्या दबाव तंत्राच्या घडामोडीमध्ये सत्यता असल्याचे दिसून येते.सध्या देशातील राजकारणाने वेगळीच कलाटणी मारली आहे.जो पक्ष किंवा राजकीय पुढारी सत्ताधारी पक्षात प्रवेश करेल त्याला भ्रष्टाचाराच्या आरोपातून क्लीन चिट दिली जाते म्हणजेच जो करोडो रुपयांचे घोटाळे करतो व भ्रष्टाचार करतो तो अचानक दुधासारखा शुद्ध कसा काय होतो?हा सर्वात मोठा प्रश्र्न न्याय व्यवस्थेसमोर आहे. त्यामुळेच ६०० वकिलांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहून न्याय व्यवस्थेबद्दल चिंता व्यक्त केल्याचे वाटते.हे सत्य आहे जे अनेक वर्षांपासून भ्रष्टाचारात लुप्त आहेत किंवा होते अशांवर सत्ताधाऱ्यांमार्फत टिकासुध्दा केली जाते ते अचानक पक्ष बदलताच एका दिवसात शुद्ध होतात ही कोणती जादूची छडी सत्ताधारी पक्षा जवळ आहे.

याचा शोध न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून व कायद्याच्या चौकटीतून लागायला पाहिजे.६०० वकिल जेव्हा सरन्यायाधीशांना पत्र लिहितात तेव्हा त्याच्या पत्रात अर्ध सत्य अवश्य दडलेले आहे .याची कायदेशीर शहानिशा व्हायला हवी.भारतीय न्याय व्यवस्था प्रबळ आणि बलशाली आहे. त्यावर जर कोणी दबाव तंत्राचा वापर करून मनमानी करीत असेल तर त्यावर कठोर कारवाई होने अत्यंत गरजेचे आहे.

भारत देश हा न्याय व्यवस्थेवर टिकून आहे.त्यामुळे न्याय व्यवस्था किंवा कायदा यातील ढवळाढवळ १४० कोटी जनता कदापि सहन करणार नाही.याकरीता ६०० वकिलांच्या पत्रावर सन्माननीय सरन्यायाधीश व सन्माननीय राष्ट्रपती यांनी या पत्राची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी व न्याय व्यवस्थेला आणखी सुदृढ करावे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# दल बदलू नेते आणि कार्यकर्ते

दिवसेंदिवस भारतीय राजकारण गढुळ होत चालले आहे. एकमेकांवर रोजच आरोपांच्या फैरी झाडत पक्ष बदलून खोटी आश्र्वासने जनतेला राजकिय पुढाऱ्यांकडून दिली जात आहेत. ज्या विचारांना प्रमाण माणुन जनतेनी दिलेली मत स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी पुढारी लोक विकताना दिसत असल्याचे आरोपही होत असताना त्याचे समर्थक म्हणुन उदयास आलेले कार्यकर्ते मात्र बुचकळ्यात पडल्याचे दिसून येत आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांकडे विचारांची देवाण –घेवाण ही केवळ खुर्ची हस्तगत करण्यासाठी असल्याचे दिसून येत आहे. विरोधात असताना आपल्या नेत्यासाठी कार्यकर्त्यांनी विरोधातील नेत्यांना चांगलेच सुनावलेले असते. जर आपलाच नेता पुर्वीच झालं–गेलं विसरून मांडीला मांडी लावून बसत असेल तर कार्यकर्त्यांनी तुमच्यासाठी वेळोवेळी खंबीरपणे साथ देऊन विरोधकांना नामोहरण करण्याची एकही संधी सोडलेली नाही. तुम्ही मात्र तुरूंगात जाण्याच्या भीतीने पक्ष बदलत आहात हे कितपत योग्य आहे.

आज ग्रामिण भागात राजकीय पुढाऱ्यांची सतरंजी उचल भक्तांची काही कमी नाही. तुम्हीच सांगा नेत्यानो कार्यकर्त्यांना तुम्ही दिले काय ? तुमच्या मागे येणारा कार्यकर्ता आपल्या परिवाराची घडी नीट बसवण्याची सारखी धडपड करत असताना त्यांना तुम्ही, बाटली आणि मटणाच्या आहारी घालून अंधभक्त बनवले आहे. आपला नेता आपल्यासाठी आज ना उद्या काही तरी करेल यासाठी निवडणुकीच्या काळात तो आपल्या परिवाराची चिंता न करता राब–राब–राबतो. निवडून आल्यावर त्याला कचऱ्याप्रमाणे फेकुन दिल्या जाते.

नुकतीच लोकसभेची धामधुम सुरू झाली, त्या अनुषंगाने पुढाऱ्यांनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या प्रचाराला लागा अशा सुचना दिल्या गेल्याचे वृत्त ऐकायला मिळत आहे. त्यानुसार कार्यकर्तेही कामाला लागल्याचे दिसून येत आहे. येथे एक गोष्ट सांगावीशी वाटते कि, आजची तरूण मुलं सद्सदविवेक बूद्धीचा विचार न करता कोणाचाही प्रचार करत आहेत. आज आपल्या देशात काय चालू आहे, काय झाले पाहिजे याचाही विचार होणे गरजेचे आहे. सख्ख्या बापाचा शब्द न ऐकणारी मुलं नेत्याचा शब्द मात्र खाली पडू देत नाहीत. आमचाचं नेता निवडून येणार असे मॅसेज फेसबुक, व्हाट्सअप सारख्या इतर सोशल मिडीयावरून फिरताना दिसत आहेत. आपल्या भागात किती विकास कामे केली ? त्यापैकी किती पुर्ण झाली ? नागरीकांच्या हिताची कामे किती केली ? शेतकऱ्यांचे किती प्रश्र्न सोडवले ? असा सवाल नेत्याला विचारण्याऐवजी आजचा तरूण राजकिय नशेत होरपळत असल्याचे वास्तव चित्र समोर येत आहे.

राजकारणातील दलबदलू नेत्यांचा स्वभाव बघीतला तर देशहिताची कामे न करता, कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून स्वतःचं चांगभल करण्याचा मानस दिसून येत आहे. हे आजचं वास्तव नाकारता येत नाही. कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करायचे आणि शेवटी नेत्याने सांगितले म्हणुन गुपचुप शांत बसायचे असाच नियोजीत कार्यक्रम दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून एक निष्ठ राहुन पक्ष बांधनी केलेल्या कार्यकर्त्याच्या वाट्याला नेहमीच सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे. दल बदलू नेत्याला ज्या पक्षांनी अनेक पदे दिली, मंत्री होण्याचा मानही दिला तो त्या पक्षाचा होऊ शकला नाही, तो देशाचा आणि जनतेचा काय होईल हाही विचार कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. नुसतंच नंदी बैल गुबूगुबू करत बसू नये. याचे भान कार्यकर्त्यांनी ठेवले पाहिजे.

ज्या नेत्यासाठी आपण विरोधातील नेत्यांवर आरोप केले. तालुका गाव पातळीवर दुसऱ्यांचा रोष ओढवून घेतला तेच आता एकाच मंचावर खुर्चीला खुर्ची लावून बसत आहेत. पण कार्यकर्त्यांचे जीवन तसे नाही, ज्या व्यक्तींसाठी आपण आपल्याच गावातील बांधवांसोबत भांडत बसलो आणि आपले संबंध बिघडून टाकले ते आता कसे सुधारतील या विवंचनेत अनेक कार्यकर्ते अडकल्याचे बघायला मिळते. पन्नास–शंभर रूपयाचे पेट्रोल दुचाकी गाडीत टाकून नेत्यांची हुजरेगिरी करण्यापेक्षा, आपल्या आयुष्यातील बहुमुल्य वेळ वाया न घालवता आजच्या तरूण मुलांनी सद्सदविवेक बूद्धीचा विचार करूण आपले जीवनमान कसे सुधारता येईल याकडे लक्ष देतील का ? हा येणारा काळचं ठरवेल.

**दाऊ गाडगेवाड, पत्रकार**
**हिमायतनगर, जि. नांदेड**
**मो. नं. ९९२१५७२९३६**

## नूतन लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर यांनी पदभार स्विकारला

लातूर : लातूर जिल्ह्याच्या नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी म्हणून पुणे येथून आलेल्या श्रीमती वंदना काटकर यांनी मंगळवारी दुपारी प्र.जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांच्याकडून आपला पदभार स्विकारला.



जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने श्रीमती वंदना काटकर यांचा सत्कार ग्रंथालय संघाचे जेष्ठ संचालक हावगीराव बेरकीळे यांनी शाल,पुष्पगुच्छ देऊन केला. याच कार्यक्रमात गेल्या एक वर्षांपासून प्र.ग्रंथालय अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी केलेले संजय मस्के यांचा सन्मान जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह तथा मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले यांनी केला. यावेळी आवर्जून उपस्थित असलेले कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील वरिष्ठ लिपिक शिवशंकर बिराजदार यांचा सत्कार जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे यांनी केला.राम मेकले यांनी नविन अधिकाऱ्याचे स्वागतपर व संजय मस्के यांच्या कार्याचा गौरवपर मनोगत व्यक्त केले.श्रीमती वंदना काटकर यांनी आपण लातूर जिल्ह्यात सर्वांच्या सहकार्याने ग्रंथालय चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी प्रयत्नशील राहू केला. संजय मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लातूर जिल्ह्याची सार्वजनिक ग्रंथालय चळवळ राज्यात अग्रेसर अशी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीधर स्वामी यांनी तर आभार राम मोतीपवळे यांनी मानले.कार्यक्रमास जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक जहांगीर सय्यद, नंदकुमार घोगरे,संतोष करमले, सुशिल मेकले,ग्रंथालय निरीक्षक हरिश्र्चंद्र डेंगळे,वरिष्ठ लिपिक हिरालाल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# लस उपलब्ध असूनही, हिपॅटायटीस बी का आहे धोकादायक

आज जगभरात जागतिक हिपॅटायटीस दिवस साजरा केला जात आहे. हिपॅटायटीस आजाराबाबत लोकांना जागरूक करणे हा त्याचा उद्देश आहे. हा एक दशक जुना आजार आहे, तरीही दरवर्षी या रोगाच्या लाखो केसेस समोर येतात. या आजारापासून बचाव करण्यासाठी लस देखील उपलब्ध आहे, परंतु तरीही ती खूप घातक आहे. या आजारामुळे यकृत पूर्णपणे खराब होऊ शकते. कर्करोग होण्याचाही धोका असतो.




लस असूनही हा आजार इतका धोकादायक का आहे हा मोठा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्याआधी हिपॅटायटीस म्हणजे काय आणि कधी होतो हे जाणून घेऊया.

काय आहे हिपॅटायटीस

हिपॅटायटीस हा यकृताचा आजार आहे. सुरुवातीला यकृतावर सौम्य सूज येते. हा आजार विषाणूमुळे किंवा यकृताला झालेल्या नुकसानीमुळे होतो. हा आजार व्हायरल हेपेटायटीसपासून सुरू होतो. हा त्याचा सर्वात सामान्य प्रकार आहे. हे अनेक विषाणूंपैकी एकामुळे होते. हिपॅटायटीसचे विषाणू अ, ँ, ण, आणि ए असे पाच प्रकार आहेत. यापैकी हिपॅटायटीस ँ आणि ण हे जास्त धोकादायक आहेत. यामध्ये मृत्यूचे प्रमाणही जास्त आहे.

यकृतावर हल्ला करते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती

फोर्टिस हॉस्पिटलमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हेपॅटोबिलरी सायन्सेस विभागातील डॉक्टर स्पष्ट करतात की जर हिपॅटायटीसवर वेळेवर उपचार केले गेले नाहीत, तर तो प्राणघातक ठरू शकतो. या आजाराचे अनेक प्रकार आहेत. यामध्ये अल्कोहोलिक हिपॅटायटीस हा अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे होतो. यामध्ये ऑटोइम्यून हिपॅटायटीस अतिशय धोकादायक आहे. हा एक जुनाट आजार आहे, ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती यकृतावर हल्ला करते.

हिपॅटायटीस आजारामुळे यकृतालाही पूर्णपणे नुकसान होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, यामुळे यकृत निकामी आणि यकृताचा कर्करोग देखील होऊ शकतो. हे कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना सहजपणे बळी बनवते. हे टाळण्यासाठी, लक्षणे वेळेवर ओळखणे आणि उपचार करणे आवश्यक आहे.

काय आहेत लक्षणे

वारंवार कमी ताप

भूक न लागणे

सतत ओटीपोटात दुखणे

नेहमी थकवा

गडद मूत्र

त्वचा पिवळसर होणे

लस असूनही का धोकादायक आहे हा आजार ?

तज्ज्ञ डॉक्टर सांगतात की हिपॅटायटीस बी साठी एक लस आहे. मुलाच्या जन्मानंतर, ही लस १० वर्षांपर्यंत दिली जाऊ शकते. पुढील दोन डोस पहिल्या डोसच्या ६ महिन्यांच्या आत घेतले जाऊ शकतात. प्रौढांनाही ही लस दिली जाऊ शकते. हिपॅटायटीस बी या लसीमुळे बऱ्याच प्रमाणात प्रतिबंध होतो, परंतु बहुतेक लोकांना या लसीबद्दल माहिती नसते.

यातील लोक लसीकरणापासून वंचित राहून आजाराच्या विळख्यात सापडले आहेत. काही प्रकरणांमध्ये, लोक लक्षणांकडे देखील लक्ष देत नाहीत. त्यामुळे हिपॅटायटीसचा आजार यकृत खराब करत राहतो आणि हा आजार आढळून आल्यावर परिस्थिती अत्यंत गंभीर बनते.

## यश मिळवण्यासाठी गाढवाच्या तीन गोष्टी लक्षात ठेवा, जाणून घ्या काय सांगते Chanakya Niti

आचार्य चाणक्य यांनी आपल्या नीतिशास्त्रात जीवनातील विविध गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. त्यांनी जीवनाबाबत मांडलेली तत्त्व अजूनही तंतोतंत लागू होतात. त्यामुळे चाणक्य नीतिबाबत आजही चर्चा होत असते. आचार्य चाणक्य यांना राजकारण आणि नीतिमत्ता यांची चांगली परख होती. कधी कधी आयुष्यातल्या छोट्या छोट्या गोष्टी खूप काही शिकवून जातात. अशा परिस्थितीत शिकण्यासाठी नेहमीच वाव असतो. आचार्य चाणक्य यांच्यानुसार, एखाद्या व्यक्तीने गाढवाकडून काही गोष्टी शिकल्या पाहिजेत. याम ुळे जीवनात यश मिळू शकते. गाढवाकडून तीन गोष्टी शिकल्या पाहिजेत असे आचार्य चाणक्य सांगतात.



आयुष्यात समाधानी राहा: आचार्य चाणक्य यांच्या नीतिशास्त्रानुसार गाढव जीवनातील प्रत्येक गोष्टीत समाधानी असतो. कुठेही काहीही द्या चालत असतो. त्याचप्रमाणे ज्ञानी माणसाने सुद्धा प्रत्येक गोष्टीत समाधानी असले पाहिजे. निकालाची काळजी करू नका, फक्त मेहनत आणि प्रामाणिकपणे तुमचे काम करा. यश एक दिवस नक्कीच पायाशी येईल.

आळस सोडून द्या: चाणक्य म्हणतो की प्रत्येकामध्ये काहीतरी खास असते. त्याचप्रमाणे गाढवामध्येही एक गुण आहे की, त्याला आळस नसतो. थकलेले असूनही गाढव ओझे वाहून नेतो. त्याचप्रमाणे हुशार व्यक्तीही आळस न करता आपले ध्येय साध्य करू शकते. यासोबतच व्यक्तीने आपल्या ध्येयापासून कधीही विचलित होऊ नये.

काम करत राहणं: जसे गाढव प्रत्येक स्थितीत आपले काम करत असते. त्याच्यावर थंडी किंवा उष्णतेचा अजिबात परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे माणसाने हवामानाची चिंता न करता काम करत राहावे. जर एखादी व्यक्ती हवामानातील बदलामुळे विचलित झाली असेल तर ते त्यांचे ध्येय गमावू शकतात.

## विकसित भारतासाठी भाजपा ला साथ द्या वर्धा येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी विकसित भारताचा संकल्प सोडला आहे. या विकासाच्या संकल्पाला साथ देण्यासाठी रामदास तडस यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथे बुधवारी केले. वर्धा लोकसभा मतदारसंघातून भाजपा शिवसेना, राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार, खा.रामदास तडस यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या विजय संकल्प सभेत श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा.डॉ.अनिल बोंडे, ज्येष्ठ नेते रामदास आंबटकर, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आशीष देशमुख तसेच शिवसेना, राष्ट्रवादी, रिपब्लिकन पक्षाचे नेते, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री. फडणवीस यावेळी म्हणाले की, वर्धा जिल्हा काँग्रेसमुक्त झाला, मात्र या भागातून पंजाही गायब होण्याचे श्रेय शरद पवारांना आहे. या मतदारसंघासाठी काँग्रेसला लोकसभेसाठी उमेदवारही सापडला नाही, परिणामी राष्ट्रवादीचा उमेदवार आयात करण्याची वेळ काँग्रेसवर आली.



कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष असलेल्या खा. तडस यांचा उल्लेख करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तडस हे पुन्हा विरोधकांना धोबीपछाड देणार आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार गट) शरद पवार यांचे कुस्तीतील पॅनल ताब्यात घेणारे तडस यांना यंदा ६० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळतील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महात्मा गांधीजी यांची भूमी असलेल्या वर्धा मतदारसंघाचे नेतृत्त्व करणारे रामदास तडस हे संयमी खासदार म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या दोन कालावधी दरम्यान लोकसभेत १०३५ प्रश्र्न उपस्थित केले. तर ११३ चर्चांमध्ये सहभाग घेतला. अशा कार्यक्षम उमेदवारालाच वर्ध्याचे मतदार पुन्हा निवडून देतील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला. खा. तडस यांचे ही यावेळी भाषण झाले.

## वंचितचा सुप्रिया सुळेंना पाठिंबा; सुळेंनी मानले आभार

बारामती (पुणे) : लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत वंचितचा समावेश होऊ शकला नाही. मात्र, असं असलं तरी बारामती लोकसभा मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दर्शविला आहे. यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. म्हणून मानले आंबेडकरांचे धन्यवाद : खासदार सुप्रिया सुळे आज (३ एप्रिल) बारामती दौऱ्यावर आहेत. बारामती तालुक्यातील निरावागज येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सुळे म्हणाल्या की, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आणि त्यांच्या संघटनेने एका विश्वासाच्या नात्याने मला जी साथ आणि आशीर्वाद दिलेत त्याबद्दल त्यांचे खूप खूप मन:पूर्वक आभार मानते. यासाठी ही लढाई : बारामतीत जरी वंचितने पाठिंबा दिला असला तरी इतर ठिकाणी उमेदवार उभे केले आहेत. याचा फटका बसेल का? या प्रश्नावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, अजूनही चर्चा चालू आहे.

## त्यांच्या वाणीतून....

आपण भारताला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवण्याची गॅरंटी दिली आहे. आता तिसऱ्या टर्ममध्ये आपल्याला मागच्या १० वर्षांहून आणखी एक मोठे काम करणार आहे. आपल्याला २४ तास वीज मिळावी, वीज बील शून्य व्हावे आणि वीजेपासून आपली कमाईही व्हावी, असे माझे लक्ष्य आहे. तसेच, पुढच्या टर्ममध्ये भ्रष्टाचाऱ्यांवर आणखी कठोर कारवाई होईल.

– पंतप्रधान नरेंद्र मोदी

जर मी तुमच्या घराचे नाव बदलले तर ते माझे होईल का? अरूणाचल प्रदेश हे भारताचे राज्य होते, आहे आणि नेहमीच राहील. नाव बदलण्याने कोणताही परिणाम होत नाही. आमचे सैन्य नियंत्रण रेषेवर तैनात आहे.

– परराष्ट्र मंत्री एस जयशंकर

भाजपाकडून धमकाविलं जात आहे. भाजपाकडून माझ्या जवळच्या व्यक्तीला सांगण्यात आले की, पक्षात सामील होऊन राजकीय करियर वाचवावे. अन्यथा एका महिन्यात ईडीकडून अटक करण्यात येणार आहे. रविवारी रामलीला मैदानावरील गर्दी पाहून भाजपा पक्षातील नेते हैराण झाले आहेत. आप पक्षाच्या नेत्यांना अटक केल्याशिवाय पक्ष संपणार नसल्याचं भाजपा नेत्यांना वाटत आहे. ईडीकडून आम आदमी पक्षाच्या चार वरिष्ठ नेत्यांना अटक केली जाणार आहे. त्यामध्ये मला, सौरभ भारद्वाज, राघव चड्ढा आणि दिलीप पांडेय यांना अटक केली जाईल..

–आम आदमी पक्षाच्या मंत्री आतिशी

## (गुरु वचन)
## मन करारे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण

एक खूप प्राचीन कथा आहे. श्वेतकी नावाचा एक राजा होता. तो खूप यज्ञ करत असे. त्यामुळे त्याची खूप ख्याती झाली होती. त्याने एकदा सलग बारा वर्षे अग्नीदेवाला अखंड शुद्ध तुपाची आहुती दिल्याने अग्नी देवाची पाचनशक्ती वाढली. याचा वाईट परिणाम असा झाला, की अग्नीदेवतेचे तेज कमी झाले आणि तो मंद पडला

मग त्याने ब्रह्मदेवाकडे धाव घेतली आणि त्यांना तेज परत मिळविण्याचा मार्ग विचारला. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला खांडव येथील जंगल जाळून टाकण्याचा सल्ला दिला. त्याने तसे केले, परंतु इंद्रदेवाने पाणी टाकून ती आग विझवली. मग त्याने कृष्ण आणि अर्जुनाला आपल्या साह्यतेचे आवाहन केले.

अर्जुनाने अग्नी देवाला विनंती केली, की मला देवेंद्राशी युद्ध करण्यासाठी तू शस्त्रे पुरवायची. अग्नी देवाने त्याला गांडीव धनुष्य आणि दिव्यास्त्र दिले, तर कृष्णाला एक चक्र भेट दिले. यानंतर अग्नी देवाने आपल्या शक्तीद्वारे पुन्हा खांडव जंगल जाळण्यास सुरुवात केली.

वाढत्या आगीने पृथ्वीवर मात्र हाहाकार माजला. त्यावर परत देवेंद्राने आपल्या शक्तीने पाऊस पाडण्यास सुरुवात केली, परंतु अर्जुन आणि कृष्णाने पावसाला रोखले. यावेळी इंद्राच्या मदतीला देव, असुर, यक्ष, राक्षस, सर्प असे अनेक जण धावून आले, परंतु या साऱ्यांचा कृष्ण आणि अर्जुनापुढे निभाव लागला नाही.

अखेर अग्नी देवतेने आपली आग पसरवल्याने त्यांची तब्बेत पूर्ववत झाली. आणि त्यांच्या चेहऱ्यावर तेज परतले. तात्पर्य इतकेच की, जर शरीर सुखी असेल, तर मनही प्रसन्न राहते. आणि मन प्रसन्न तर चेहऱ्यावर आपोआप तेज दिसते.

तुम्हाला ताजेतवाने दिसायचे असेल तर तुम्हाला आपले शरीर तर स्वस्थ ठेवायलाच हवे. परंतु, याच सोबत आपले मनही प्रसन्न ठेवणे गरजेचे आहे.

## उपदेशकथा,
## निरपेक्षी-सदासुखी !

जगज्जेता सिकंदर (अलेक्झांडर) बादशहाच्या समकालीन असणाऱ्या डायोजिनीस या ग्रीक तत्त्वचिंतकाची ही गोष्ट. तो निसर्गापासून धडा घेणारा मुनीच होता. 'माणसाने कमीत कमी गरजा ठेवाव्यात, म्हणजे तो सुखी होतो' असे त्याचे तत्त्व होते. कुत्रा कसा मनमुराद भटकतो, मिळेल ते खातो, ना घर ना दार, ना कपडा ना लत्ता; तसेच माणसाने राहावे असे तो सांगायचा म्हणून त्याच्या पंथाला उपहासाने 'सिनीक' (कुत्र्यांचा) पंथ म्हणू लागले. त्याच्या निधनानंतर नागरिकांनी त्याच्या कबरीवर कुत्र्याचीच प्रतिमा बसवली. फक्त तो एक सोटा जवळ बाळगत असे नि कमरेस पंचा. पाणीसुद्धा ओंजळीने प्यायचा. तो दिवसासुद्धा हाती पलिता घेऊन फिरायचा नि कुणी विचारले तर सांगायचा, 'सच्चा माणसाच्या शोधासाठी हा दिवा घेऊन फिरतो आहे' सिकंदर बादशहा त्याची कीर्ती ऐकून भेटायला आला. 'मी बादशहा सिकंदर, हवं ते माग, मी देईन' असे त्याने सांगितले. डायोजिनीस म्हणाला, 'माझं ऊन अडवून उभा आहेस तेवढा बाजूला उभा राहा. मला दुसरं काही नको.'

कथा उपदेश : नि:स्पृहाला जग तृणवत् वाटते.

## वंचितांच्या विकासाचे डॉ.आंबेडकरांचे स्वप्न मोदी सरकारने पूर्ण केलेअकोला येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई : देशातील वंचित, गरिब, आदिवासी, शेतकरी यांचा विकास करण्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साकार केले. मोदी सरकार यापुढच्या काळातही वंचितांना न्याय देईल,असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी अकोला येथे केले.



अकोला लोकसभा मतदारसंघातील भाजपा-महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना झालेल्या 'विजय संकल्प सभेत' श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अकोल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील,भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, आ. हरीश पिंपळे, आ.श्र्वेता महाले आदी उपस्थित होते. वंचितांच्या कल्याणासाठी यापुढेही सरकारी योजनांचा पैसा प्राधान्याने खर्च केला जाईल. यावेळची निवडणूक ही जनतेची निवडणूक आहे. जनतेचा पंतप्रधान पुन्हा सत्तेवर आणण्यासाठी अनुप धोत्रे यांना विजयी करा,असे आवाहनही श्री. फडणवीस यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात देशाचे संविधान सुरक्षित असल्याचे नमूद करत श्री. फडणवीस म्हणाले की, अस्तित्वाच्या भीतीमुळे संविधान बदलण्याविषयीचा अपप्रचार विरोधकांकडून केला जात आहे. पंतप्रधान मोदी यांना धर्मग्रंथापेक्षाही संविधान महत्त्वाचे आहे. अटलबिहारी वाजपेयी, जॉर्ज फर्नांडिस सारख्या २ लाखांहून अधिक नेत्यांना, सर्वसामान्य कार्यकर्त्यांना आणीबाणी लादून तुरुंगात टाकण्याचे महापाप काँग्रेसने केले. त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी संविधानाचा गैरवापर केला होता, याचे श्री.फडणवीस यांनी स्मरण करून दिले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. ३ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यासह, नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.



याप्रसंगी उद्योजक चैतन्य चापसी, माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरकर, प्रा. सुधीर अनवले, महाराष्ट्र नाभिक महामंडळ लातूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे, गोविंद भोळे, विश्र्वास भोसले, लक्ष्मण गायकवाड, सुरेश इटकर, मनोहर गायकवाड, जगन्नाथ गवळी, अमोल सावंत, सुतेश गायकवाड, बालाजी सूर्यवंशी, महादेव माने, बजरंग वानमारे, नारायण महाबोले आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## राशीभविष्य ०४ एप्रिल २०२४

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण

ठरलेल्या एखाद्या मंगलकार्याची खरेदी करण्यात वेळ घालवाल. जीवनसाथीबरोबर संबंध चांगले राहतील.

वृषभ : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:उत्तर

मागे केलेले वाचन किंवा गुरु समान व्यक्ती यांचा उपयोग निश्चितच होऊ शकेल.

मिथुन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पूरब

वैवाहिक जीवनात सामंजस्य व सोशिकतेची भूमिका ठेवणे आवश्यक. प्रकृतीची काळजी घेणे हितावह ठरेल.

कर्क : शुभ रंग : लाल, शुभ दिशा:पश्चिम

वैवाहिक जोडीदाराची मिळणारी साथ महत्त्वाची ठरेल. खाण्या-पिण्याची पथ्ये विसरू नका.

सिंह : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूरब

घरासंबंधीचे प्रश्न, खरेदी-विक्री इ. व्यवहार थोड्याशा प्रयत्नाने व तडजोडीने लाभदायक ठरतील.

कन्या : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:उत्तर

घरगुती प्रश्नात मार्ग काढण्यासाठी होणाऱ्या बैठका यशस्वी होतील. मोठेपणापायी होणारा खर्च टाळा.

तुळ : शुभ रंग : निळा, शुभ दिशा:पश्चिम

वैवाहिक व कौटुंबिक जीवनात घडणाऱ्या शुभ घटनांतून मिळणारा उत्साह बाहेरील ताणतणाव पेलण्यास समर्थ ठरेल.

वृश्चिक : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण

विवाहविषयक बैठका यशस्वी होतील. त्यानिमित्ताने होणारी खरेदी सर्वांच्या पसंतीने होईल.

धनु : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा:उत्तर

वैवाहिक व कौटुंबिक जीवनात काही आनंददायी घटनांची नोंद होईल. प्रवास करावा लागेल.

मकर : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा:पूरब

घरात मंगलकार्ये ठरतील. मुलांच्या दृष्टीने एखादी शुभवार्ता कानी येईल. व्यवसायात भरभराट होईल.

कुंभ : शुभ रंग : काळा, शुभ दिशा:दक्षिण

आर्थिक गणिते जमून येणार असली तरी काही उपद्रवशक्तीचा त्रास होणार नाही असे पहा.

मीन : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम

वैवाहिक जीवनात काही प्रेमप्रसंग बहार आणतील. करम णूकप्रधान बाबीवरील खर्च वाढेल.

०४ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर हर्षल व मंगळाचा प्रभाव आहे. तुमचे विचार मूलगामी व क्रांतिकारक असतात. जुनाट परंपरांच्या चौकटी मोडून टाकण्यात तुम्हाला आनंद वाटतो. आपली नवी विचारसरणी लोक नक्की स्वीकारतील असा तुम्हाला आत्मविश्वास असतो. पुष्कळदा आपल्या निर्णयात तुम्ही अनपेक्षितपणे फेरफार करता त्यामुळे लोक तुम्हाला विक्षिप्त व लहरी समजतात. तुमच्याकडे अलौकिक प्रतिभा असते. तिच्या जोरावर भविष्यकालात प्रत्यक्षात येणाऱ्या, येऊ शकणाऱ्या गोष्टींची तुम्ही कल्पनाचित्रे रंगवता.

लोकांमधली विश्वासार्हता कमी होऊ द्यायची नसेल तर आपल्या निर्णयात सतत बदल करणे टाळा. आपले विचार पटवून देण्यासाठी लोकांच्या भावनांना आवाहन करा. अपस्मार, पक्षाघात, मेंदूत रक्तस्त्राव असे विकार तुम्हाला होऊ शकतात. चंचल, धरसोड वृत्ती टाळण्यासाठी ध्यान आवश्यक.

कार्यक्षेत्र : संशोधनाची आवड असल्याने प्रशासकीय वा हिशोबाशी संबंधीत कामकाजापेक्षा तुमचे मन प्रयोगशाळेतच अधिक रमेल. लोकांच्या गराड्यात वावरण्यापेक्षा एकांतातच तुमच्या बुध्दीला जास्त चालना मिळेल. रसायने, उर्जा, इंधने, वीज, अणुऊर्जा यांची निर्मिती व वापर यांचे संशोधन करणाऱ्या संस्थेत तुमचा उत्कर्ष होऊ शकतो. खगोलशास्त्र, अंतराळ विकास, खगोलभौतिकी, परग्रहसंपर्क अशा क्षेत्रात तुमच्या कर्तबगारीस वाव मिळेल.

प्रणयी जीवन : तुमचे विचार, जीवनपध्दती क्रांतिकारक असल्याने सामान्य माणसाला तुमच्याशी जमवून घेणे जड जाते. शिवाय तुमचे विचार कधी बदलतील याची शाश्वती नसल्याने भिन्नलिंगी व्यक्तीला तुमच्याबल थोडी असुरक्षितताही वाटते. जुनाट विचारांच्या माणसांशी जमणे अशक्य असल्याने डिसेंबर २१ ते जानेवारी १९ दरम्यानच्या व्यक्ती टाळा.

## इतिहासात आजचा दिवस ०४ एप्रिल

अंतरराष्ट्रीय

१९४९ – अमेरिकेच्या पुढाकाराने साम्यवादी रशियाविरोधात नाटोची (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) स्थापना.

१९७८ – शांततेचा 'नोबेल पुरस्कार' मिळालेल्या मार्टिन ल्यूथर किंग यांचा अर्ल रे या गोऱ्या अमेरिकीने गोळ्या घालून खून केला.

१९७९ – झुल्फीकार अली भुट्टो यांना फासावर चढविण्यात आले.

२००६ – मध्य अमेरिकेत आलेल्या मौसमी वादळात २७ जण ठार झाले.

२००७ – पाकिस्तानच्या दक्षिण वजीरिस्तान भागात हिसाचारात ६० विदेशी दहशतवादी ठार झाले.

२००८ – दक्षिण आफ्रिकेच्या हारुन लॉरगेट यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) नवे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून निवड झाली.

राष्ट्रीय

१९२४ – महात्मा गांधींनी 'यंग इंडिया' व 'नवजीवन' या वृत्तपत्रांचे संपादन स्वत-कडे घेतले.

२००७ – हरियाणात २८ गावाच्या पंचायतीने विश्वचषकात भारताच्या लज्जास्पद खेळाने निराश होऊन या सभ्य लोकांच्या खेळावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

२००८ – मुंबईत १९९३ साली झालेल्या बॉम्बस्फोट मालिकेप्रकरणी फाशीची शिक्षा झालेल्या झाकीर हुसेन नूर म ोहम्मद शेखच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

जन्म

१८८९ – हिंदीतील प्रसिद्ध कवी, नाटककार व पत्रकार माखनलाल चतुर्वेदी यांचा जन्म.

१८९६ – 'लाईफ'चे संपादक आणि नाटककार रॉबर्ट अेमेट शेरवूड यांचा जन्म. त्यांना चार वेळा 'पुलित्झर' पारितोषिक मिळाले.

१९०४ – सुप्रसिद्ध गायक-अभिनेते कुंदनलाल सैगल यांचा जन्म.

१९२८ – अमेरिकन कृष्णवर्णीय कवयित्री, कादंबरीकार आणि नाटककार माय अँजेलू (मार्गारीट जॉन्सन) हिचा जन्म.

१९३२ – 'सायको' या चित्रपटाचा कायमस्वरुपी शिक्का बसलेल्या अँथनी पर्किन्स या अभिनेत्याचा जन्म.

निधन

१९४० – सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते चार्लस फ्रीअर अँड्र्यूज ऊर्फ 'दीनबंधू' यांचे निधन.

१९६३ – बहुभाषा कोविद आणि इतिहासकार राहुल सांकृत्यायन यांचे निधन.

१९९६ – संस्कृत पालीचे अभ्यासक आणि मराठी साहित्यिक आनंद साधले यांचे निधन.

२००६ – एका ऐतिहासिक प्रकरणात देशाचे राजकीय वातावरण ढवळून काढणारी दिंवगत शाहबानोंचे पती मोहम्मद अहमद खां यांचे निधन.

नोटीस ..

आलेले साधे सरळ
चार ओळींचे ते पत्र
नोटीस आली बोला
बदलून जाईलं सूत्र
कळू नये कुणासही
न आलीनोटीसपात्र
कोरेकागद पाकिटा
कोकला दिवस रात्र
व्यक्त करावी भिती
रे चालणार धाडसत्र
आगी तेल टाकाया
तयार सवंगडी मित्र
अटक होणारं मला
बोभाटा करा सर्वत्र
डागाळले नेतेसगळे
सम्मेलन होई एकत्र
पिटत रहायचा डंका
निर्मळ नितळ चरित्र
निमित्ते सांगा ओरडू
आहोत केवढे पवित्र
गैरवापर होई सत्तेचा
रंगवावे बिबत्स चित्र
बदनाम करी व्यवस्थे
खुर्चीचा माज विचीत्र
जबाबदारी झटकायं
बनवायचे विश्र्वामित्र
उद्रेक उसळे जोरात
पत्र होई निमित्तमात्र

२

किस्मत ..

एकत्र जमले नाराज
चालवताना गलबत
सुस्त पडले महाराज
खलाशीकरे खलबत
पहारेकरी मस्तावले
बंडाळी होई अलबत
मोडकळीस दरवाजे
सहज येईलं मुसिबत
पळवून नेली मुलगी
नाव दिलेले मोहबत
पाऊल पडले वाकडे
कळले कुठे खिलबत
खिंडार जुन्यापक्षाला
स्वता आणली नोबत
लुटले घर आपल्यांने
बडवत रहावे नौबत
वाजतगाजतपक्षांतर
गावभर फिरे मारबत
तहानले ठेवले त्यांना
आकंठ पाजा सरबत
चूक जरी आपली ती
कोकला गद्दाराबाबत
वेळ पडता काय कसे
निघाले गद्दारा सोबत
निष्ठावान दावणीला
आया रामा खिदमत
जाणारे असे गयाराम
बिघडून गेली किस्मत

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६...**

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात विद्यापीठिय उन्हाळी पदवी परीक्षा २०२४ सुरळीत सुरू

लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर



शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय (केंद्र क्रमांक ३०४), लातूर येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत विद्यापीठिय उन्हाळी पदवी परीक्षा २०२४ दि. ०२ एप्रिल २०२४ पासून सुरळीतपणे सुरू झाली आहे. ही परीक्षा दि. ०२ एप्रिल २०२४ ते १० मे २०२४ पर्यंत सुरू राहणार असून सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रामध्ये बी. ए. आणि बीएस्सी. शाखेतील एकूण ९१९७ विद्यार्थी परीक्षा देत आहे. या परीक्षेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके यांचे मौलिक मार्गदर्शन मिळत असून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरू आहे. केंद्र प्रमुख म्हणून डॉ. राजकुमार लखादिवे, सहाय्यक केंद्र प्रमुख म्हणून डॉ. विनायक वाघमारे कार्य करीत असून कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, राम पाटील, योगीराज माकने, योगेश मोदी, रंगनाथ लांडगे, संतोष येंचेवाड आणि भीमाशंकर सुगरे यांचे सहकार्य मिळत आहे. पदवी परीक्षेच्या प्रारंभ दिनी परीक्षार्थी आणि पालकांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी पुष्पहार आणि गुलाब पुष्प देऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सन्मान करून परीक्षेसाठी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहे.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे महाविकास आघाडी पदाधिकाऱ्यांकडून नांदेड शहरात स्वागत

प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख बुधवार दि. ३ एप्रिल रोजी दुपारी नांदेड लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष) अधिकृत उमेदवार वसंतराव बळवंतराव चव्हाण पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी व महारॅलीसह सभेला उपस्थित राहण्यासाठी नांदेड शहरात आगमन झाले असता त्यांचे महाविकास आघाडी पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.



यावेळी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनअण्णा हंबर्डे, नांदेड लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार वसंतराव बळवंतराव पाटील चव्हाण, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राज्य संघटक एकनाथ पवार, नांदेड शहर प्रमुख गौरव कोडगिरे, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष डॉ.विठ्ठल पावडे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, राजेसाहेब सवई, मुकेश पाटील, साहेबराव काळे, गिरीधर पाटील, डाकोरे सुभाष, रायबोले राजू, खुशालराव जाधव, कांडाळकर माधव, डोम्पले केदार आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# फास्टफुडमुळे वाढतोय कर्करोगाचा धोका

सध्या मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढले आहे. कॅन्सर सारख्या जीवघेण्या आणि असाध्य आजाराचे प्रमाण मुलांमध्ये वाढण्याचे कारण शोधण्यासाठी संशोधकांनी संशोधन केले. या संशोधनाचा अहवाल नुकताच बमेडमध्ये प्रकाशित करण्यात आला. या अहवालात मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढण्यास फास्टफुडला जबाबदार धरण्यात आले आहे. संशोधकांनी असा दावा केला आहे की फास्टफुडमुळेच मुलांमध्ये स्टोन आणि कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. हा अहवाल मुलांसह पालकांच्याही डोळ्यात अंजन घालणारा आहे.



आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात.

अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत.

काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजार होऊ शकतो हे आता संशोधनानेच सिद्ध झाले आहे त्यामुळे आतातरी पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी माजी आमदार दिनकर माने यांना वाढदिवसानिमित्त दिल्या शुभेच्छा लातुर लोकसभा निवडणूक अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा

प्रतिनिधी : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हा प्रमुख माजी आमदार दिनकर माने यांनी आपल्या सहकाऱ्यासोबत माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची बाभळगाव निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. यावेळी माजी आमदार दिनकर माने यांना वाढदिवसानिमित्त माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.



याभेटी दरम्यान लातुर लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रचार संदर्भाने विविध महत्वपूर्ण विषयावर चर्चा झाली. यावेळी लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, प्रदीप राठोड, पप्पूभाई (श्रीपाद) कुलकर्णी- जिल्हा समन्वयक, लातुर, एकनाथ पवार - राज्य संघटक, लोहा राहुल मातोळकर - युवा सेना प्रमुख, लातुर चंदू पाटील आडगावकर - शिवसेना तालुका प्रमुख, लोहा, सचिन पेठकर- तालुका प्रमुख, कंधार, संजय ढाले पाटील- तालुका प्रमुख लोहा, साहेबराव काळे पाटील- संघटक नांदेड जिल्हा यांची उपस्थिती होती.

## शिरीन संजू लोखंडे यांची पहिल्या महिला कामगार सह आयुक्त पदावर पदोन्नती

मुंबई : फुले शाहू आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या आयुष्यमती.शिरीन संजू लोखंडे यांची राज्यातील पहिल्या महिला कामगार खात्यातील सह आयुक्त पदावर पदोन्नती झालेल्या आहेत. राज्यातील अनेक संघटीत असंघटित कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात आणि कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना योग मार्गदर्शन करत असतात. कामगार विभागात गेल्या तीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिरीन संजू लोखंडे यांची सरकारने कामगार सहआयुक्तपदी नियुक्ती केली. सहआयुक्तपदी शिरीन लोखंडे या पदोन्नती मिळालेल्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. कामगार आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण,बालकामगारांची सुटका,कामगार कायद्यांबाबत जागरुकतेच्या कार्यशाळा,महिला कामगार कर्मचारी मेळावे,परिषदा अशा अनेक उपक्रमांमध्ये लोखंडे यांचा सक्रिय सहभाग घेत असतात. राज्यभरातील फुले शाहू आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे कामगार वर्गात आनंद साजरा करण्यात येत आहे. त्याच्या कार्यालयातील कर्मचारी अधिकारी नेहमीच कुटुंबासारखे त्यांच्या सोबत उभे राहतात.दरवर्षी महापरिनिर्वाण दिनी हे दिसून येते. त्याच प्रमाणे क्रांतिकारी विचारांची भिम जयंती उत्सव त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयात दरवर्षी साजरी होत असते. अशा क्रांतिकारी विचारांच्या अधिकारी शिरीन संजू लोखंडे राज्यातील पहिल्या महिला कामगार सह आयुक्त पदावर पदोन्नती झाल्या बदल सागर तायडे अध्यक्ष स्वतंत्र मजदुर युनियन महाराष्ट्र राज्य यांनी विशेष हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचलीसाठी शुभेच्छा दिल्या.




सागर तायडे यांस कडून.

## गुरुकुल स्पर्धा परीक्षा २०२३-२४ मध्ये स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचे घवघवीत यश

लातूर : जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय एमआयडीसी लातूर येथील गुरूकुल प्रज्ञाशोध परीक्षा २०२३-२४ साठी बसविण्यात आलेल्या एकूण २३४ विद्यार्थ्यापैकी ४३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले तर २८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले असून एकूण ९९ विद्यार्थ्यांनी गुरूकुल स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे. त्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब, संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक निळकंठराव पवार, समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक तुकाराम येलाले, अॅकॅडमीक कोऑर्डीनेटर वर्षा वेदे, स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख वर्षा लोंढे, आश्विनी कांबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# डॉ.घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व हॉस्पिटलचा परवाना रद्द करावा;मातंग समाजाची मागणी

लातूर: लातूर येथील आयकॉन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रमोद घुगे यांनी हॉस्पिटलच्या लिफ्टच्या कामाच्या संबंधाने मातंग समाजातील कामगार आनंद प्रल्हाद कोटंबे यांना अमानुषपणे मारहाण करून जीवे मारण्याची जमकी दिली.डॉ.प्रमोद घुगे यांनी पैशाच्या जोरावर लातूर शहरात दहशत निर्माण केले असून दलित समाजाच्या कामगाराला जातीय द्वेषातून माणुसकीला काळीमा फासणारे गुन्हेगारी कृती केले आहे. त्यांच्या आयकॉन हॉस्पिटलमध्ये लिफ्ट बसविण्याचे कंत्राट अनंत कोटुंबे यांना दिले होते त्या संबंधित कायदेशीर कराराही केले होते. हे काम महागात पडत आहे या गैरसमजुने त्यांनी लिफ्ट बसविण्याचे चालू असलेले काम बंद केले आणि कामगार आनंद कोटंबे यांच्याकडे ५० लाख रुपयाची मागणी केली अन कुटुंबे यांना ते शक्य नसल्याने डॉ.प्रमोद घुगे यांनी आनंद कोटंबे यांचे अपहरण करून त्यांच्या फार्म हाऊस मधील म्हशीच्या गोठ्यात दोन दिवस दाबून ठेवले व भाडोत्री गुंडाकडून त्यांना सतत दोन दिवस अमानुष मारहाण केले.एवढेच नव्हे तर त्यांच्या गुप्तांगांमध्ये मिरचीची पूड टाकून त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचारही केला व मरणासन्न अवस्थेत रेल्वे स्टेशन रोडला टाकून दिले. कोटुंबे शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांकडे धाव घेतली. लातूर जिल्ह्यातील पोलिस, जिल्हा प्रशासन आरोपी डॉ. घुगे यांचे सगेसोयरे असल्याने त्यांना पोलीस दाद देत नव्हते.अखेर सामाजिक संघटनेने प्रशासनावर दबाव वाढविल्याने त्यात कारवाई झाली पण अजूनही तीन-चार दिवस झाले तरीही डॉ.घुगे यांना पोलिसांकडून अटक होत नाही. एवढा अमानुष अत्याचार झाल्यानंतरही त्यांच्यावर ३०७ सारखा गुन्हा नोंद होत नाही, यासाठी समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना २ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात आरोपी डॉ. प्रमोद घुगे यांचे वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र व त्यांच्या हॉस्पिटलचा परवाना रद्द करावा अशा आशयाचे निवेदन दिले आहे. याची प्रत माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री,माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय पालकमंत्री,माननीय स्थानिक आमदार अमित देशमुख, माननीय पोलीस अधिक्षक,माननीय आयुक्त मनपा यांच्याकडेही देण्यात आल्याची यात नमूद केले आहे. या निवेदनावर सर्वश्री अशोक देडे, संतोष मस्के, दशरथ मस्के, गोरोबा लोखंडे, नारायण कांबळे,शिरीष दिवेकर, सुभाष सूर्यवंशी, अंगद वाघमारे , गायकवाड बी .पी.,मोहन शिंदे, सूर्यवंशी बी. पी.,आनंद वैरागे, के. के.मुखेडकर ,भानुदास कुडके, रामलिंग भडंगे,मारुती माने, दिनकर मस्के,संतोष पटनुरे, प्रवीण जोहारे, नागनाथ कलवले,तुकाराम केदासे, डॉ.शिवाजी जवळगेकर, मोहन सुरवसे, पी.के .सावंत आदीसह समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894